# प्रतिज्ञापत्र

''मंजुश्री गोखले यांच्या 'तुकयाची आवली' या कादंबरीचा चिकित्सक अभ्यास'' या विषयावरील सदरची प्रबंधिका मी शिवाजी विद्यापीठाच्या एम. फिल. (मराठी) पदवी परीक्षेसाठी लिहिली आहे.

ही प्रबंधिका अथवा तिचा कोणताही भाग मी कोठेही, कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

दिनांक : २८-०८-२०११.

कांबळे बाळाताई परशराम
(अभ्यासिका)

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, कांबळे बाळाताई परशराम यांनी **''मंजुश्री गोखले यांच्या 'तुकयाची आवली' या कादंबरीचा चिकित्सक अभ्यास''** या विषयावरील प्रबंधिकेचे संशोधन कार्य माझ्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्ररित्या केले असून ते समाधानकारकरित्या पूर्ण केले आहे.

सदर प्रबंधिका शिवाजी विद्यापीठास एम. फिल (मराठी पदवीसाठी) सादर करण्यास माझी अनुमती आहे. ही प्रबंधिका अथवा तिचा कोणताही भाग कोठेही, कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

कोल्हापूर

दिनांक : २९-०८-२०११

**डॉ. जी. पी. माळी**
(मार्गदर्शक)

# ऋणनिर्देश


प्रस्तुत प्रबंधिका पूर्ण होताना कर्तव्यपूर्तीच्या भावनेनं मनाला समाधान होत असून या प्रबंधिकेसाठी मार्गदर्शक म्हणून राजर्षी शाहू कॉलेज, रूकडीचे प्राचार्य पितृतुल्य- आदरणीय गुरूवर्य डॉ. जी. पी. माळी सर लाभले हे मी माझे सद्‌भाग्य समजते. श्री. माळी सरांनी मार्गदर्शक म्हणून मला जे मार्गदर्शन केले आहे ते माझ्या लेखी खूप उच्च दर्जाचे आहे. सरांनी वेळोवेळी मला बारीक तपशील समजावून दिले. प्रबंध अधिकाधिक अर्थपूर्ण व नेमका होण्यासाठी त्यांनी महत्त्वाच्या सूचना दिल्या. त्या मला पुढील अभ्यासात आणि आयुष्यात मोलाच्या ठरणाऱ्या आहेत. सरांची मी शतश:ऋणी राहीन.

तसेच शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागाचे प्रमुख आदरणीय प्रा. ठाकूर सर, प्रा. शिंदे सर, किरवले सर, रणधीर शिंदे, स्मार्त सर यांचेही मोलाचे सहकार्य लाभले. संसारातील खडतर समस्येशी सामना देत असताना सुद्धा माझ्या विषयी वेगळं स्वप्न उराशी बाळगलं त्यांच्या पाठिंब्यामुळे, तपश्चर्येमुळे त्यांचे स्वप्न मी या प्रबंधाद्वारे पूर्ण करू शकले ते माझे पती श्री. महेंद्र ठाणेकर यांचे सहकार्य शब्दातीत आहे.

माझी गरज भासत असताना मला लेखन, वाचन करण्यास समजून घेऊन वेळ दिला ती माझी चिमुकली दोन मुलं, चि. तुषार आणि वैभव यांची साथ मला नेहमीच मिळाली आहे. त्यांनी कधीच आढेवेडे घेतले नाहीत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने प्रेरित होऊन अज्ञानी असूनही शिक्षणाचे महत्त्व समजलेले माझे स्वर्गीय आई व बाबा यांचे आशीर्वाद माझ्या पाठीशी आहेत. माझ्या प्रापंचिक अडचणीत मदत करून मला अभ्यासास प्रवृत्त करणारे माझे सासरे श्री. रामचंद्र ठाणेकर यांचे सहकार्य अतुलनीय आहे.

आम्हा भावंडाच्या शिक्षणासाठी ज्यांना निरक्षर रहावे लागले त्या माझ्या दोन बहिणी सौ. कमल व विमल यांचेही सहकार्य मला मिळाले आहे. माझे भाऊ श्री. रंगराव, एन. पी. कांबळे (सर), वाय. पी. कांबळे (सर) यांचा मला प्रबंधिकेसाठी पाठिंबा मिळाला.

तसेच एस. ए. कांबळे सर (मिणचेकर) यांनीही माझ्या प्रबंधाविषयी वेळोवेळी मला सहकार्य केले. माझ्या वहिनी सौ. मिरा, मनिषा यांना माझ्या विषयी खूप मोठा अभिमान आहे. त्या माझ्या प्रबंधिकेची आगत्याने चौकशी करून मला प्रोत्साहित करतात. त्याचप्रमाणे माझी भाचरे मीरा, सरीता, रुपा, दशरथ, आशा, हणमंत ऊर्फ पप्पू, प्रशांत, प्रसाद, सोनाली, प्रणाली व सृष्टी ही मंडळी मला कुतुहलाने प्रश्न विचारून प्रबंधिकेची चौकशी करतात व मला सहकार्य करतात.


माझ्या संशोधन कार्यात अगत्याने चौकशी करून सहकार्य करणाऱ्या सुचेता कोरगांवकर मॅडम, बाबा मुळीक, एम. एस. पाटोळे सर, तसेच कोरगांवकर हायस्कूलचे मुख्याध्यापक एस. एस. सौंदलगे सर, उपमुख्याध्यापक श्री. व्ही. सी. पाटगांवकर सर, पर्यवेक्षक एन. डी. सिद्नाळे सर व संपूर्ण शिक्षक वृंद या सर्वांनी माझी औपचारिक विचारपूस करून वेळोवेळी मदत केली आहे.

शिवाजी विद्यापीठातील खर्डेकर ग्रंथालय, नियतकालिक विभाग, संदर्भ विभाग यांचा मला खूप उपयोग झाला.

तसेच श्रीकांत कॉम्प्युटर्सचे श्री. सदाशिव देसाई यांनी वेळेत प्रबंधिकेचे काम पूर्ण करून दिले, त्याबद्दल त्यांचे आभार मानणे मी माझे कर्तव्य समजते.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

# अर्पणपत्रिका



आठवण होते तुमची

तुम्ही जगलेल्या जीवनाची

आजही आठवते चाललेली वाट

खडतर कष्टांची

शतशः ऋणी राहीन मी माझ्या

आदरणीय आई, बाबा, मामींची

– बाळताई

# अनुक्रमाणिका


| अ. न. | तपशील | पृष्ठांक |
| --- | --- | --- |
| प्रकरण पहिले | १९६० नंतरची चरित्रात्मक कादंबरी | १ – २० |
| प्रकरण दुसरे | मंजुश्री गोखले यांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व | २१ – २७ |
| प्रकरण तिसरे | 'तुकयाची आवली' कादंबरीचा आशय | २८ – ६४ |
| प्रकरण चौथे | 'तुकयाची आवली' च्या व्यक्तिरेखेचे स्वरूप | ६५ – ८८ |
| प्रकरण पाचवे | वाङ्मयीन व भाषिक वैशिष्ट्ये | ८९ – ११० |
| प्रकरण सहावे | उपसंहार | १११ – ११६ |
| | संदर्भग्रंथ सूची | ११७ – ११८ |
| | परिशिष्टे | ११९ – १२३ |

# विषय निवडण्यामागची भूमिका

जेव्हा मी एम.फिल.ला प्रवेश घेतला तेव्हा अगदी गोंधळून गेले होते. विषय कोणता कसा निवडावा याबद्दल काहीच माहिती मला नव्हती. जेव्हा मी मार्गदर्शक म्हणून डॉ.जी.पी. माळी यांची निवड केली तेव्हा सरांनी मला माझ्या आवडी-निवडीबद्दल विचारले. तेव्हा सरांना मी सांगितले की मराठी वाङ्मयामधील चरित्र कादंबरी हा वाङ्मय प्रकार आवडतो. तेव्हा सरांच्या वाचनात आलेला दैनिक सकाळ मधील दिनांक १४ सप्टेंबर २००८ मधील धनाजी गुरव यांचा 'तुकयाच्या आवलीचा न्यायासाठी अभ्यासाची गरज' हा लेख मला दाखविला व मंजुश्री गोखली यांनी लिहिलेली 'तुकयाची आवली' ही चरित्रात्मक कादंबरी मला वाचावयास दिली.

कादंबरी वाचत असताना मनात एक प्रकारची हुरहुर वाटत होती. पण या कादंबरीवर काम केले तर माझ्या मनातल्या शंका आणि प्रश्न यांचे निरसन होईल असे वाटले आणि ही चरित्रात्मक कादंबरी निवडली. तसेच या कादंबरीवर कुठेही काम झाले नसल्याची खात्री करून घेतली.

संत साहित्याच्या पार्श्वभूमीवर आधारीत लिहिलेली 'तुकयाची आवली' ही कादंबरी खूपच लक्षणीय वाटली. संत तुकाराम हे आपल्या भक्तीने, अभंगवाणीने, विद्वत्तेने संतपदाच्या शिरोमणी पदावर पोहोचलेले आहेत. त्यांना विठ्ठभक्ती करताना आवलीसारख्या कर्तव्यनिष्ठ, पतीनिष्ठ व कुटुंबवत्सल पत्नीची साथ होती. तिचा संसारातील संघर्ष फार मोठा आहे. तिने संसार सांभाळला आणि तुकारामांनी भक्ती केली. संत तुकारामांच्या अणुएवढ्या रुपापासून ते आकाशाएवढ्या कर्तृत्त्वापर्यंत प्रत्येक क्षणात, प्रत्येक संकटात आणि प्रत्येक परिवर्तनात आवली भागीदार होती. परंतु या आवली विषयी फारशी माहिती कुठेही पहायला मिळत नाही. जी काही माहिती आहे. ती म्हणजे तुकारामांची पत्नी आवली ही कजाग, भांडखोर होती अशी जनमानसात तिची प्रतिमा आहे. पण ती तशी का होती याचा उलगडा कोठेच नाही म्हणून

मंजुश्री गोखले यांनी एक स्त्री म्हणून आवलीवरील सहानुभूतीपोटीच आवलीला न्याय देण्यासाठी ही कादंबरी लिहिली असल्याचे 'माझी भूमिका' मध्ये म्हटले आहे.

कादंबरी निवडण्यामागील मुख्य कारण म्हणजे आवलीने तुकारामांचा संसार सांभाळला त्यामुळे त्यांच्या विठ्ठलभक्तीत खंड पडला नाही. आवलीची संसारासाठीची तळमळ तर तुकारामांना भक्तीची आस यामुळे आवली एक हाती संसार सांभाळताना दिसते. कादंबरीतील आवली तुकारामांचा जीवनसंघर्ष हा संसार व भक्ती अशा परस्पर विरोधी चित्रित झाला आहे. त्यांचा जीवनसंघर्ष हे कादंबरीचे मुख्य वैशिष्ट्ये आहे म्हणून मी ही कादंबरी निवडली.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.